ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

# दक्षिण पूर्व आशियामध्ये प्राचिन भारतीय संस्कृतीचा प्रसार

**श्री. अनंत हरीभाऊ घोसेकर**

## सारांश

प्राचीन भारताला अतिशय समृध्द असा वारसा लाभलेला आहे. यामध्ये प्राचीन साहित्य, वेद, पुराणे, महाकाव्ये तर आहेतच त्यासोबतच हिंदू धर्म, बौध्द धर्म, जैन धर्म व त्यांची संस्कृती यांचा समावेश होतो. हया प्राचीन भारतीय संस्कृतीच्या वारशाचा सुदूर अंतिपूर्वेकडील दक्षिण पूर्व आशियातील प्रत्येक भागामध्ये संपूर्ण व्दिपावर प्रचार प्रसार झाला, भारतीय संस्कृतीची भरभराट झाली. या क्षेत्रामध्ये विविध भागात भारतीयांच्या वसाहती निर्माण झाल्या प्राचीन काळात या दक्षिण पूर्व आशियामधील व्दिपांसोबत भारताचे घनिष्ट व्यापारी संबंध होते. प्राचीन भारताच्या या देशाशी चालणाऱ्या समृध्द व्यापारामुळे भारतासोबतच या सगळ्या देशांमध्ये आर्थिक संपन्नता आली त्यामुळेच या दक्षिण पूर्वेकडील देशांना सुवर्णव्दिप अशी संज्ञा दिली गेली. या समृध्द सुवर्णदिपाबद्दलच्या अनेक दंतकथाची उत्पत्ती त्याकाळी झाली. म्हणुन संशोधकाने भारतीय संस्कृतीचा प्रचार व्हावा यासाठी घेतात.

मुख्य शब्द : संस्कृती, दंतकथा, प्राचीन भारतीय संस्कृती.

## प्रस्तावना

आशिया खंडात भारताचे स्थान दक्षिण आशियात आहे. एवढेच नाही तर भारत हा द्वीपकल्पीय देश असून त्याच्या तीन बाजू समुद्राने वेढलेल्या आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला बंगालचा उपसागर तर दक्षिणेला असलेल्या हिंदी महासागरामुळे भारताला विशेष स्वरूपाचे भू-राजकीय व भूसामरिक महत्त्व प्राप्त झालेले आहे की, ज्याचा प्रभाव हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांवर पडतो.

भारताच्या मुख्य भुमीपासून सुदूर अतीपूर्वेकडे म्हणजेच दक्षिण पूर्व आशियाच्या भागात तत्कालीन काळात वाहतुकीच्या सोयी नसताना किंवा सलग असा भुभाग नसताना, जलवाहतुकीची प्रगत साधने नसताना सुध्दा समुद्रापलीकडे भारतीय संस्कृतीचा प्रसार इतक्या प्राचीन काळी कसा झाला हे एक कोडेच आहे. प्राचीन भारतीयांच्या साहसिक आणि सामुद्रिक कृत्यांचे हे एक प्रमाण आहे आणि यामुळे प्राचीन भारताला भारताबाहेर सुध्दा एक विशिष्ट महत्व यामुळे प्राप्त झाले. किंबहुना भारताने प्राचीन दक्षिण पूर्व आशियाच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये एक खुप मोठा ठसा उमटवलेला आहे. दक्षिण पूर्व आशियाच्या या

ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

सुदूर भागात प्राचीन काळात भारतीयांच्या वसाहतीसुध्दा निर्माण झाल्या.

भारतात उन्नत व समृद्ध झालेल्या हिंदुस्थानी संस्कृतीचा विलक्षण प्रभाव जगातल्या फार मोठ्या भूभागावर निर्माण झालेला होता. त्याचे स्वरूप विविधांगी होते. नंतरच्या इस्लामिक व युरोपीय देशांनी अंगिकारलेल्या साम्राज्यवादाची प्रेरणा कदाचित प्राचीन भारतीयांकडूनच घेतलेली असावी. तथापी सांस्कृतिक विस्ताराची त्यांची शैली व तंत्रे भिन्न होती. भारतीयांनी कोणत्याही हिंसाचारी, आक्रमक व सक्तीच्या मार्गाचा अवलंब न करता विधायक अहिंसक मार्गाने आपला प्रभाव निर्माण केलेला होता. व्यापार, धर्मप्रसार, भाषा, साहित्य, शास्त्र, राजनीती, कायदा, समाजजीवन व कलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा विस्तार झालेला होता. राजकीय प्रभावापेक्षा त्यांचा आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक प्रभाव मोठा होता. आजही आग्नेय आशिया, चीन, जपान, सिलोन, कोरिया व तिबेटमध्ये भारतीय कायदा, न्याय, प्रशासन, युद्धनीती, धर्म, देवता, सण, महोत्सव, भाषा व जीवनपद्धती प्रचलित आहे. एकोणविसाव्या शतकातल्या ब्रिटिश साम्राज्यापेक्षाही जास्त प्रदेश भारतीय संस्कृतीने व्यापलेला होता. हा हिंदी संस्कृतीच्या, सामर्थ्याचा आणि भारतीय निव्वळ एकलकोंडे अध्यात्मवादी नसल्याचा ठोस पुरावा आहे. सिंधु संस्कृतीपासून भारतीय प्रभावाचे संदर्भ मिळतात. सुमारे एक हजार वर्षे (स. २००-१२००) भारतीय संस्कृतीचे जगात अस्तित्व होते. जावा, सुमात्रा, चम्पा, कम्बुज, बोर्निओ, बाली (सर्व इंडोनेशिया), मलाया, सयाम, ब्रह्मदेश, चीन, कोरिया, जपान, तिबेट, सिलोन, नेपाळ, अफगाणिस्तान, मध्य पश्चिम आशिया, युरोप व आफ्रिकेत भारतीय संस्कृतीचे प्रभुत्व होते. हा प्रभाव राजकीय, आर्थिक, धार्मिक, भारतीय संस्कृतीचा जागतिक प्रभाव सामाजिक व सांस्कृतिक स्वरूपाचा होता. महाकाव्ये, पुराणे, संस्कृत साहित्य, तामिळ वाङमय चिनी ग्रंथ आणि परदेशीय वास्तू, शिल्पे आलेख व परकियाच्या लिखाणामधून विशाल भारताचे दर्शन घडते.

भारतीय संस्कृती सर्वसमावेशक असुन भारतीय संस्कृतीला काळानुरूप विविधांगी जडणघडण लाभलेली आहे. प्राचिन काळात भारतीय संस्कृतीचा प्रभाव हा संपूर्ण आशिया खंडावर पडलेला होता. या संशोधनामध्ये भारताच्या प्राचीन संस्कृतीचा दक्षिण पूर्व आशियामधील विविध देशयांमध्ये झालेल्या प्रसार व प्रचाराचा अभ्यास करण्यात आला आहे.

## भारतिय संस्कृतीचा प्रसार

ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

भारताच्या अतिपूर्वेकडील या भागात प्राचीन काळी साधारणपणे इ. स. च्या पहिल्या शतकापासून भारतीय संस्कृतीच्या प्रसारास सुरूवात झाली. येथील अनेक भागांमध्ये भारताशी संबंधीत विविध धर्मांचा प्रसार झाला. या भागातील विविध देशाशी राजकीय, आर्थिक, सांस्कृतीक आणि व्यापारी संबंध दृढ होत गेले. प्राचीन साहित्यात तर भारतीय प्रदेशाच्या समुद्रापलीकडील या प्रसाराला दिपान्तर असे म्हटले गेले आहे. प्राचीन साहित्यानुसार तत्कालीन भारताचा विस्तार हा भुमीवर तर झालाच परंतू समुद्रावरसुध्दा झालेला होता, ज्याची सिमा दक्षिण आशियामधील जावा-सुमात्रा बेटांपर्यंत होती आणि जेथे या व्दिपांचा शासक राहत असे, असे प्राचीन साहित्यात उल्लेख आढळतात. प्राचीन भारतीय उपनिवेशांचा या भागातील विस्तार दक्षिण पूर्व आशियाचे हे भारतियीकरण इ. स. पहिल्या शतकापासून तर तेराव्या शतकापर्यंत झालेले आढळते. याचे अनेक पुरावे प्राचीन साहित्यामध्ये आलेले आहेत. प्राचीन भारतीय संस्कृतीचा हा विस्तार दक्षिण पूर्व आशियाच्या संपूर्ण भागामध्ये झालेला आढळून येतो. यामध्ये दक्षिण पूर्वेकडील चम्पा, जावा, सुमात्रा बोर्निओ, कम्बुज, सयाम, मलाया, शैलेन्द्र साम्राज्य, लंका, इत्यादी व्दिपासोबतच चीन आणि तिबेट चा सुध्दा उल्लेख करावा लागेल.

दक्षिण पूर्वेकडील या भागाचे भारतासोबत व्यापारी आणि राजनितीक संबंध तर होतेच परंतु त्याचबरोबर सांस्कृतिक, धार्मिक आणि त्यासोबतच भावनिक संबंधाची सुध्दा भरभराट झालेली आढळून येते. जसजसे या भागाशी भारताचे आर्थिक संबंध, व्यापारी संबंध दृढझाले. संस्कृतीचा प्रचार प्रसार झाला तसे कालातराने भारतीय वंशाच्या राजवंशाचा सुध्दा प्रभाव येथे पडला भारतीय राजनैतिक शक्ती येथे अधिकार गाजवू लागल्या भारतातील विविध पराक्रमी राजकीय शक्तींनी येथे आपआपल्या स्वतंत्र राज्यांची स्थापना केली. इतकेच काय त्यासोबतच आपआपल्या राज्याचा राज्यविस्तार सुध्दा केला. यामुळे मुळ भारतवंशीय राजसत्तांची स्थापना येथे होण्यासोबतच भारताच्या संस्कृतीचा सुध्दा अंतिशय व्यापक स्वरूपात विस्तार येथे झाला. भारतीय संस्कृतीच्या प्रभावक्षेत्राचा विचार करतांना असे लक्षात येते की येथे हिन्दू धर्मासोबतच मूळ भारतीय बौध्द धर्माचा सुध्दा विकास झाला. येथील धर्म हा प्राचीन वैदिक धर्म नव्हता तर बौध्द आणि जैन धर्माच्या काळात भारतात विकसीत झालेला नवब्राम्हण धर्म होता. कालांतराने बौध्द धर्माच्या प्रसारानंतर कालपरत्वे ब्राम्हण धर्माने पुन्हा बौध्द धर्मावर विजय मिळवला. ब्राम्हण धर्मामधील शैव आणि वैष्णव अशा दोन्ही मतांचा येथील वेगवेगळ्या भागांवर प्रभाव राहिला, ब्रम्हा, विष्णु, शिव, दुर्गा, महिषमर्दिनी अशा विविध प्राचीन देवीदेवतांच्या मंदिरासोबतच येथे बोरोबुदूर सारखे जगप्रसिद्व बौध्द महास्तुप देखिल निर्मिले गेले. येथिल काही व्दिपांवर वैदीक कालीन, महाभारत आणि रामायणकालीन संस्कृती आजसुध्दा अक्षुण्ण असलेली आढळून येते. भारताप्रमाणेच धर्म, जाती, उपजाती

ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

अशा विविध भारतीय प्रथा परंपरा येथे आजसुध्दा काही भागांमध्ये आढळून येतात. अशाप्रकारे तत्कालीन भारताशी असणारे साधर्म्य, एकरूपता यांचे वर्णन विविध प्राचीन साहित्यात आढळून येतात. येथील विविध भागामधील स्मारके, विविध कला आणि साहित्यावरसुध्दा भारतियीकरणाची छाप आहे. याचे कम्बोजमध्ये निर्मीत प्राचीन अंगकोर वट मंदिर हे एक नितांतसुंदर उदाहरण आहे. तर इंडोनेशियाच्या जावा व्दिपावर असलेले बौध्दधर्मिय पुरातन भव्य बोरोबुदुर महास्तुप ही देखिल तत्कालीन अतिशय महान कलाकृती आहे. अशाप्रकारे येथिल प्रत्येक भागात भारतियत्वाची साक्ष देणारे अनेक पुरावे स्मारके, मंदिरे आणि प्राचीन अभिलेख व इतर अनेक कलाकृती आढळतात.

## भारतीय संस्कृतीची प्राचीन परंपरा

भारतालाएक महान सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक परंपरा लाभलेली आहे. भातरवर्षाला प्राचिन काळी आर्यदेश म्हटल्या जात होते. आर्य शब्दाना तात्पर्य आहे श्रेष्ठ आणि देश म्हणजे क्षेत्र. याप्रमाणे आर्य देशाचा अर्थ श्रेष्ठ क्षेत्र असा होतो. भारताला मध्यदेश सुद्‌धा म्हटल्या गेले आहे. भारत अनेक देशांच्या मध्यभागी स्थित असल्यामुळे त्याला मध्यदेश असे सुद्‌ध म्हटल्या गेले आहे.

धर्म, भाषा, संस्कृती यांचा संबंध पाहिला तर काही शतकांआधी (इ.स. पूर्व 3 ऱ्या शतकापासून इ. स. 1300) ज्याप्रमाणे भारतीय संस्कृती, धर्म, भाषा मध्य आशियातसेच पश्चिम आशियामध्ये प्रचलितहोती त्याचप्रमाणे दक्षिण पूर्व आणि दक्षिण आशियाच्या विस्तृत भागामधील बहुतेक सर्व भाग भारताचाच एक भाग होते. ज्याप्रमाणे भारताच्या मुख्य भूमीमध्ये सौराष्ट्र, बंग कलिंग, पांडय हे भारतीय राज्य, जनपदे होती. त्याचप्रमाणे इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, व्हिएतनाम, सयाम, म्यानमार आदि विस्तृत प्रदेशात भारतियांनी आपले उपनिवेश स्थापन केले होते. ह्या प्रदेशातील मूळ निवासी लोकांना, जातींना आपल्या भारतीय धर्माचा परिचय करून देऊन त्याचा प्रचार व प्रसार करून भारतीय संस्कृतीच्या रंगात त्यांना सुद्धा रंगवून टाकले होते.

या सर्व देशामधील तत्कालीन राजांचे नाव बहुदाभारतीय वंशाचे होते. येथील बहुतेक राज्यांमधील प्रशासनक व्यावहारीक कार्यासाठी संस्कृत भाषेचा प्रचूर मात्रेमध्ये उपयोग केला जात असे. विस्तीर्ण प्रदेशामधील अनेक ठिकाणी मिळालेल्या शिलालेखांमध्ये, प्राचीन साहित्यामध्ये ब्राम्ही आणि इतर भारतीय लिपींचा उपयोग केलेला आहे. संस्कृत भाषेमधील अनेक शिलालेख आणि ताम्रपट उपलब्ध झालेले आहेत. या सर्व देशांमधील तत्कालीन निवासी शैव, वैष्णव त्याच प्रमाणे बौद्‌धर्मावलंबी होते. अनेक मठ आणि आश्रमांसोबतच मंदिर, विहार,चैत्य, स्तुप इत्यादींचा निर्माण येथील राजे आणि संपन्न लोकांद्वारे केल्या

ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

गेले. या सर्व ठिकाणी वैदिक, पौराणिक, तसेच बौद्ध साहित्याचे पठण-पाठण केल्या जात असे. या विभिन्न धार्मिक वास्तुमध्ये शिव, विष्णु, ब्रम्हा, गणेश, बुद्ध, बोधिसत्व इत्यादी मुर्तींची प्रतिष्ठापणा केलेली होते. या मंदीराचे व स्तुपांचे अनेक अवशेष या सर्व देशांमध्ये विविध ठिकाणी आढळून येतात. त्यातील काही मंदीरे, स्तुप तर आजसुद्धा अत्यंत चांगल्या अवस्थेत आहेत, सुरक्षित आहेत.

मध्य आशिया तसेच अतीपूर्व आशिया, ज्यामध्ये चीन, जापान व कोरिया यांचा समावेश होतो. याप्रमाणेचदक्षिण पूर्व आशियाच्या बहुतेक संपूर्ण क्षेत्रावर भारताच्या सांस्कृतीक साम्राज्याच्या विस्तार झालेला आढळतो. भारताच्या पुर्वेस म्यानमार, कंबोडिया,मलेशिया, इंडोनेशियः, सयाम, लाओस, व्हिएतनाम आणि फिलेपीस हे राष्ट्र आहेत. या सर्व राष्ट्रांमध्ये भारताचे धर्मप्रचारक मग ते शैवपंथाचे असोत, वैष्णव पंथाचे असोत किंवा बौद्ध मतावलंबी असोत, आपापल्या धर्माच्या प्रसारासाठी ते आले होते. धर्मप्रसारासोबतच भारतियांनी येथे आपले भारतिय उपनिवेश, वसाहती सुद्धा स्थापन केल्या. धर्मप्रचारासोबतच व्यापारीक संबंध सुद्धा अनेक वर्षापासुन या प्रदेशामध्ये अस्तित्वात होते.

इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत या दक्षिण पूर्वेच्या देशामध्ये सामाजीक सभ्यतेचा विकास झालेला नव्हता. आदिम काळासारखे मागास जीवनपद्धती अनेक ठिकाणी विद्यमान होती. ज्याप्रमाने भारतीय धर्मप्रचारकांनी भारतीय धर्माचा प्रसार व प्रसार या ठिकाणी केला त्याचप्रमाणे येथील मागास सामाजिक सभ्यतेलासुद्धा विकासाचा मार्ग दाखवलाबौध्द प्रचारकांच्या सोबतच शैव, वैष्णव इत्यादी पौराणिक धर्माचे प्रचारक सुद्धा येथे गेले आणि येथील मूळ निवासींना आपापल्या धर्माचे अनुयायी बनवले. धर्मप्रसारासोबतच भारतीयांनी या दक्षिण पूर्वच्या क्षेत्रामध्ये अनेक भारतीय वसाहती, उपनिवेश अनेक भागात स्थापन केले. या भागातील अनेक छोट्या मोठ्या द्विपसमूंहावर तसेच म्यानमार पासून इतर अनेक भागांमध्ये भारतीय वसाहतींची स्थापना झाली. हा मौर्यकाळाच्या नंतरचा काळ होता, की या संपूर्ण क्षेत्रामध्ये भारतीय लोकांसोबतच भारतीय संस्कृती, धर्म परंपरा वाढीस लागली.

शुंड सातवाहनाच्या काळामध्ये या दक्षिणपूर्व आशियाच्या विविध भागात भारतीयत्वाची सुरुवात झाली. आणि गुप्त साम्राज्याच्या काळापर्यंत ह्या भारतीयत्वाची प्रक्रिया आपल्या उत्कर्ष काळात होती. संपूर्ण दक्षिण-पूर्व आशियामध्ये भारतीय धर्माने ज्यात शैव, वैष्णव, पंथीयांसोबतच बौद्ध धर्माचा सुद्धा पर्यायाने भारतीय संस्कृती परंपरा, साहित्य, भाषा इ. चा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. या काळात येथीललोकांची नावे, राजे, गाव, शहरे, देशांची नावे भारतीय होती. साहित्य संस्कृती, धार्मिक ग्रंथ हे बहुतेक भारतीयच होते. येथील राजे भारतीय, त्यांची भाषा भारतीय लोकांची व्यावहारीक भाषा भारतीय, संस्कृती, देव-धर्म भारतीय आणि प्रशासकीय पद्धत पण तद्दन भारतीयच होती. इतका भारतीयत्वाचा

जबरदस्त प्रभाव ह्या संपूर्ण प्रदेशावर होता. भारतातून येणारे भारतीय ह्या भागाचे रहिवासी झाल्यावर येथील नगरांना वस्त्यांना आपल्या भारतातील नगरांचे-गावांचे नाव देत. येथील नद्यांचे नावांचेसुद्धा भारतीय नामकरण झाले. त्याचप्रमाणे जावा मधील एका नदीलं सरयुम्हटले गेले. अनेक नगरांची नावे जसे अयुथ्थ्या, बंका, विजयनगर, अंग, चंपा, अमरावती, पांडुरंग इ.. राजांची नावेसुद्वा, अंगवर्मा,विक्रांतवर्मा, विजय, संजय, विजयेंद्र, धनंजय, विजय, पनक्करण, शैलेंद्र, कनकवर्मा या प्रमाणे होते. त्याचप्रमाणे राष्ट्रांची नावेदेखिल चंपा, सुवर्णद्विप, यवाद्वीप, सुवर्णभूमी, श्रीविजय, इंद्रद्विप, ताम्रपर्णी, नागद्विप, कटाह, कर्पूरद्विप, अंगद्विप, कंबुज इ. होते. दक्षिण-पूर्वी आशिया च्या या विस्तिर्ण प्रदेशामधील बहुतेक संपूर्ण भागामध्ये मंदिरे, मठ, आश्रम, बौद्ध विहार, चैत्य आणि स्तुपांची मोठ्या प्रमाणावर रचना करण्यात आली. त्याचे अवशेष आजदेखिल मिळतात. काही पुरातन वास्तू तर आतादेखिल सुस्थितीत-सुरक्षीत आहेत. भारतीय भाषा संस्कृत, पाली, प्राकृत आदि व्यवहारामध्ये, प्रशासकीय स्तरावर सुद्धा वापरल्या जात होत्या.हया भारतीय भाषांमध्ये उत्कीर्ण शिलालेख येथील सगळ्याच भागामधून मिळालेले आहेत.

भारतातून अनेक साहसी व्यापारी प्राचिन काळात मोठया संख्येने व्यापारासाठी दक्षिण पूर्वी देशांची यात्रा करत. त्याचप्रमाणे या भागात धर्मप्रचारासाठी बौद्धांनी सुत्रपात केला. बौद्ध धर्मासोबतच इतर भारतीय धर्माचा सुद्धा येथे मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झाला. शैव मंदीरासोबतच वैष्व मतावलंबीयांची मंदिरे सुद्धा मोठ्या संख्येने प्रत्येक भागात निर्माण झाली. बौद्धस्तुप, चैत्यगृहे, बौद्ध विहारांचे सुद्धा अनेक भागात निर्माण झाले. हा भारतीय धर्म आणि संस्कृतीच्या प्रभाव इतका प्रभावशाली होता की आजसुद्वा भारतीय संस्कृती येथील अनेक भागात विद्यमान आहे. भारतीय नावे, शहरांची, राष्ट्रांची नावे आजसुद्वा भारतीय आहेत. सयाम, ब्रम्हदेश, कंबोडीया येथील बौद्ध धर्म आजसुद्वा अस्तित्वात आहे. मलेशिया, इंडोनेशिया सारखे काही देशामध्ये मुस्लीम आक्रमण झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात धर्मपरिवर्तनझाले असले तरी येथील संस्कृती परंपरा, साहित्य यावर आजसुद्वा भारतीयत्वाची छाप असलेली पाहायला मिळते. तत्कालीन भारतीयत्त्वामुळेच ह्या संपूर्ण क्षेत्राण बृहत्तर भारत या नावानेओळखले जायचे. बृहत्तर भारत म्हणजे भारताबाहेरील भारत. त्यामुळेच असे म्हणावे लागेल की, प्राचिन भारताचे सांस्कृतिक साम्राज्य भारताच्या पूर्वेपासून तर हया सुदूर दक्षिण पूर्व आशियाच्या संपूर्ण प्रदेशावर होते.

## प्राचीन भारतीय वसाहती मलेशीया, इंडोनेशीया

प्राचीन भारतीय व्यापारी पूर्वी देशांसोबतच्या व्यापारासाठी मलेशीया, इंडोनेशिया ह्या द्विपांच्या

दक्षिणेकडील मार्गाचा वापर करत असत.युरोपमधून, पश्चिम आशियामधील विविध भागातून भारताच्या पूर्वेस आणि दक्षिण पूर्व आशियातील विभिन्न प्रदेशांमधे व्यापारासाठी, धर्म प्रचारासाठी अशा विभिन्न कारणासाठी अश्या विभिन्न मार्गाचा वापर केला जात होता.तद्नंतरया मार्गाचा वापर वाढल्यानंतर या दक्षिण पूर्वी विशाल क्षेत्रावर आपल्या वसाहतीचे निर्माण प्राचीन भारतीयांनी केले. सर्वात आधी मलाया बेटांच्या विस्तृत भागावर भारतीय लोकांनी भारतीय वसाहती वसवल्या.

मलया बेटांवर लंग-किया-सू नामक प्राचीन भारतीय राज्याच्या उल्लेख चिनी साहित्यामध्ये आढळतो.ह्या राज्याची स्थापना इ.स च्या पहिल्या शतकाच्या उत्तरार्धातझाली असा उल्लेख चीनच्या लिआंग वंशाच्या इतिहासात आढळतो.हयालाच खुरानत्संग ने कामलंका म्हटले आहे. नागर- कृतलाम नावाच्या जावा मधील प्राचीन ग्रंथांमध्ये लंकासुक म्हणून या राज्याचा उल्लेख आहे. हे मलय बेटांमध्ये स्थापित एक भारतीय राज्य होते.येथील राजांची, राजघराण्यातील लोकांची नाचे भारतीय होती. संस्कृत भाषेचा प्रचार-प्रसार झालेला होता.

याच प्रदेशामध्ये प्राचीन काळी को-लो-चो-फेन नावाच्यादुसऱ्या एका राज्याचा उल्लेख नाग वंशीय ऐतिहासीक ग्रंथांमध्ये आढळून येतो. या राज्याची स्थितीपन-पन च्या उत्तरेस प्राचिन साहित्यावरून दिसून येते. कलशवरपुर, कलशपुर, द्वारवती असे विविध नावे या राज्यासाठी उद्देशीले गेले आहेत. चिनी साहित्यानुसार, तसेच कथासरित्सागर नुसार सुद्धा सुवर्णभुमीमधील कलशपूर नावाच्या राज्य याठिकाणी विद्यमान होते.

चिनच्या प्राचीन साहित्यानुसार पन-पन च्या दक्षिण पूर्वेला कला किंवा कोरा नामक राज्याचा उल्लेख आहे. येथील राजवंश श्रीपोरा होते. सातव्या शतकात राज्य करणाऱ्या राजाचे नाव मिं-सि-पो-रा होते. येथील लोक गाई गुरे पाळत असत, राजवंशाच्या श्रीपोरा या नावावरून असे आढळते की, हे राज्य एक प्राचिन भारतीय राज्य होते.

मलय बेटांवरील अजून एक भारतीय वसाहत पा-होऊंग ही होती. 447 इ.स. मध्ये येथील राजा सरी-पाल-वर्मा होता. ज्याने चिनच्या सम्राटाकडे आपला दूत पाठवल्याचा उल्लेख चिनी साहित्यात आहे. या देशाच्या प्राचीन चिनच्या साम्राच्यासोबत परस्पर संबंध होता.मलय बेटांच्या पूर्व भागात या वसाहतींची उपस्थितीत होती. राजाच्या वर्मा नावावरूनच असे दिसते की ही वसाहत भारतीय वसाहत होती.

चिनच्या प्राचीन साहित्यानुसार कम-तो-लीनावाचे एक भातरीय राज्य मलय बेटांमध्ये स्थित होने. कन-तो-ली चा राजा चे पो-ले-ना लिअन-तो म्हणजेचश्रीधर-नरेंद्र होता. त्यान चीनच्या सम्राटाला

ECONSPEAK: A Journal of Advances in Management IT & Social Sciences,
Vol. 8, Issue 8, August 2018 Impact Factor 5.132 ISSN: (2231-4571)
www.skirec.org Email Id: skirec.org@gmail.com

अनेक बहुमुल्य उपहार भेटस्वरूप दिले असा उल्लेख चिनी साहित्यात आढळतो. या देशात बौध्द धर्म आस्तित्वात होता. चिनी विवरणात येथील भारतीय राजांच्या नावाचे चिनी रूपांतरण केले गेले असले तरी हे एक भारतीय राज्य होते आणि येथील राजवंश भारतीय होता संदेह नाही

पन-पन नावाचे एक भारतीय राज्यसुद्धा मलय प्रदेशामध्ये स्थित होते. चिनच्या प्राचिन साहित्यानुसार तेथील राजा ब्राह्मणांचा खुप आदरसत्कार करीत असे. त्यामुळे राजाच्या आदरातिथ्याचा स्वतःला लाभ करून घेण्यासाठी भारतामधून अनेक ब्राम्हण येथील राजाच्या राजदरबारामध्ये नेहमी येत असत.

## निष्कर्ष

- भारताला एक महान सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक परंपरा लाभलेली आहे.
- भारतीय संस्कृती, धर्म, भाषा मध्य आशिया तसेच पश्चिम आशियामध्ये प्रचलित होती त्याचप्रमाणे दक्षिण पूर्व आणि दक्षिण आशियाच्या विस्तृत भागामधील बहुतेक सर्व भाग भारताचाच एक भाग होते.
- ज्याप्रमाणे भारताच्या मुख्य भूमीमध्ये सौराष्ट्र, बंग कलिंग, पांडय हे भारतीय राज्य, जनपदे होती. त्याचप्रमाणे इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, व्हिएतनाम, सयाम, म्यानमार आदि विस्तृत प्रदेशात भारतियांनी आपले उपनिवेश स्थापन केले होते.
- ह्या प्रदेशातील मूळ निवासी लोकांना, जातींना आपल्या भारतीय धर्माचा परिचय करून देऊन त्याचा प्रचार व प्रसार करून भारतीय संस्कृतीच्या रंगात त्यांना सुद्धा रंगवून टाकले होते.
- प्राचीन भारतीय उपनिवेशांचा या भागातील विस्तार दक्षिण पूर्व आशियाचे हे भारतियीकरण इ. स. पहिल्या शतकापासून तर तेराव्या शतकापर्यंत झालेले आढळते.
- प्राचीन भारतीय संस्कृतीचा हा विस्तार दक्षिण पूर्व आशियाच्या संपूर्ण भागामध्ये झालेला आढळून येतो. यामध्ये दक्षिण पूर्वेकडील चम्पा, जावा, सुमात्रा बोर्निओ, कम्बुज, सयाम, मलाया, शैलेन्द्र साम्राज्य, लंका, इत्यादी व्दिपासोबतच चीन आणि तिबेट चा सुध्दा उल्लेख करावा लागेल.
- या भागातील अनेक छोट्या मोठ्या व्दिपसमूंहावर तसेच म्यानमार पासून इतर अनेक भागांमध्ये भारतीय वसाहतींची स्थापना झाली. हा मौर्यकाळाच्या नंतरचा काळ होता, की या संपूर्ण क्षेत्रामध्ये भारतीय लोकांसोबतच भारतीय संस्कृती, धर्म परंपरा वाढीस लागली.

- **बौद्ध धर्मासोबतच इतर भारतीय धर्माचा सुद्धा येथे मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झाला. शैव मंदीरासोबतच वैष्व मतावलंबीयांची मंदिरे सुद्धा मोठ्या संख्येने प्रत्येक भागात निर्माण झाली.**
- **भारतीय धर्म आणि संस्कृतीच्या प्रभाव इतका प्रभावशाली होता की आजसुद्धा भारतीय संस्कृती येथील अनेक भागात विद्यमान आहे.**
- **भारतीय नावे, शहरांची, राष्ट्रांची नावे आजसुद्धा भारतीय आहेत. सयाम, ब्रम्हदेश, कंबोडीया येथील बौद्ध धर्म आजसुद्धा अस्तित्वात आहे.**
- **या काळात येथील लोकांची नावे, राजे, गाव, शहरे, देशांची नावे भारतीय होती. साहित्य संस्कृती, धार्मिक ग्रंथ हे बहुतेक भारतीयच होते.**

## संदर्भ

1 वासुदेव उपाध्याय : *प्राचीन भारतीय स्तूप ए गुहा एवं मन्दिर* , बिहार हिन्दी ग्रंथ अकादमी, पटना, 1972,पृ. 207

2 सत्यकेतु वद्यालंकार : *द क्षण पूर्व ए शया में भारतीय संस्कृति*, श्री सरस्वती सदन, नई दिल्ली, पंचम संस्कारण,1991,पृ. 106.107

3 ए.के. कुमारस्वामी : *हिस्ट्री ऑफ इण्डियन एण्ड इण्डोने शयन आर्ट* , एडवर्ड गोल्डस्टन, लंदन, 1927,पृ. 180

4 सत्यकेतु वद्यालंकार :पूर्वोक्त,पृ. 212

**Websites**

https://www.oecd.org/southeast-asia/countries/

https://www.nationsonline.org/oneworld/map_of_southeast_asia.htm

https://icwa.in/show_content.php?lang=2&level=3&ls_id=3144&lid=2437

http://www.economist.com/news/china/21701505-chinas-foreign-policy-could-reshape-good-part-world-economy-our-bulldozers-our-rules

https://www.apnimaati.com/2021/07/blog-post_55.html